अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । रविवार, दि. ८ डिसेंबर २०२४ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ६९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८




## भाचीच्या साखरपुड्यास गेल्यावर घरफोडी

**सोलापूर :** भाचीच्या साखरपुडा कार्यक्रमासाठी बाहेर गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने घराचा कडी-कोंयडा तोडून घरात प्रवेश करत बेडरूम मधील लोखंडी कपाटातील ठेवलेले दोन लाखाचे दागिने रोख रक्कम चोरून नेले. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी शिवदास हरवाळकर (वय-५६ रा.गुरुकृपा नगर, बाळे) हे ५ डिसेंबर रोजी साखरपुडा कार्यक्रमासाठी परगावी गेले असताना चोरी झाली. याबाबत पोलिसात फिर्याद दाखल केली आहे.



# ‘ईव्हीएम’वरून राजकारण तापले, मारकडवाडीत ‘मशाल’ पेटणार

### शरद पवारांच्या आजच्या दौऱ्यात ‘ईव्हीएम हटाव, बॅलेट पेपर लाव’ मोहिमेचा आरंभ

### आ.उत्तम जानकर यांनी दाखवली बलिदानाची तयारी

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

अवघ्या चार हजार लोकवस्तीचे माळशिरस तालुक्यातील मारकडवाडीत ‘ईव्हीएम’च्या विरोधात रान उठविल्याने हे गाव संपूर्ण देशाच्या नकाशावर झळकत आहे. ‘ईव्हीएम हटाव; बॅलेट पेपर लाव’ या मोहिमेचा श्रीगणेशा आज रविवारी मारकडवाडीतून होणार असल्याचे निश्चित झाले आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार हे मारकडवाडीत येवून या मोहिमेची मशार पेटवणार आहेत.आता विरोधी पक्षाकडून लाँग मार्चचे आयोजन केले जाणार असून त्यासाठी काँग्रेस नेते राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली ईव्हीएमविरोधात लाँग मार्च काढण्याचे निश्चित झाले आहे.त्याच्या तयारीसाठी उद्धव ठाकरे, अरविंद केजरीवाल, अखिलेश यादव, ममता बॅनर्जी आदींना आमंत्रित करण्याचे नियोजन सुरू असल्याचे सांगण्यात येते.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मतदान यंत्रात मोठा घोटाळा झाला आहे. त्यामुळे मतपत्रिकेवर मतदान घेण्याच्या मागणीवर महाविकास आघाडीचे नेते आणि आमदार हे ठाम आहेत.नव निर्वाचित आमदारांच्या राज्य विधी



मंडळाच्या अधिवशेनाला शनिवारी सुरूवात झाली.त्यात ईव्हीएमवरून मोठा गदारोळ झाला. विरोधक भलतेच आक्रमक दिसले. माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी गावातील प्रकरण शनिवारी विधानसभेत गाजले. मतपत्रिकेवर मतदान घेण्यासाठी माळशिरसचे आमदार उत्तम जानकार यांनी बलिदिनाची तयारी दाखवली. मतपत्रिकेसाठी त्यांनी आमदारकीचा राजीनामा देण्याची तयारी दर्शवली.९ डिसेंबपर्यंत विधीमंडळाचे विशेष अधिवेशन पार पडणार आहे. शनिवारी पहिल्या दिवशी विरोधी पक्षातील आमदारांनी शपथविधीवर बहिष्कार टाकला.

ईव्हीएमच्या माध्यमातून जे सत्तेवर आले आहेत. त्यांना केवळ २५.१ टक्का मतदान मिळालेले आहे. ज्यांना उर्वरित मतदान मिळाले ते पराभूत झाले आहेत. यशोमती ठाकूर, बच्चू कडू हे सभागृहाच्या बाहेर कसे राहू शकतात? माझ्या मतदारसंघात जवळपास लाखभर मते वळविण्यात आली आहेत, असाही आरोप जानकर यांनी केला. माझा विजय झाला असला तरी माझ्या मतदारसंघातील जनतेमध्ये भयानक आक्रोश आहे. एका गावात मतपत्रिकेवर मतदानही सुरू झाले होते, पण सुरक्षा दलाने बळजबरी करून तो प्रयत्न हाणून पाडला. असेही राव जानकर म्हणाले.

दरम्यान विक्रोळी विधानसभेचे शिवसेना (ठाकरे) पक्षाचे आमदार सुनील राऊत यांनीही अशाचप्रकारची घोषणा केली आहे. आमदारकीचा राजीनामा देऊन मतपत्रिकेवर निवडणूक घेण्यास मी तयार आहे, अशा आशयाची पोस्ट त्यांनी टाकली आहे. ‘‘माझ्या मतदारसंघात किमान ४० ते ५० हजारांच्या मताधिक्याने विजयी होणे अपेक्षित असताना केवळ १६ हजारांच्या मताधिक्याने माझा विजय झाला आहे, हा निकाल विक्रोळीतील जनतेलाही मान्य नाही, त्यामुळे राजीनामा देऊन मतपत्रिकेवर मतदान घेण्यास मी तयार आहे’’, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

माळशिरस मतदारसंघातील मारकडवाडीतून भाजपचे उमेदवार राम सातपुते यांना मताधिक्य मिळाले, त्यामुळे ईव्हीएमवर संशय घेऊन ग्रामस्थांनी बॅलेट पेपरवर निवडणूक घेण्याची परवानगी जिल्हा प्रशासनाकडे मागितली होती. मात्र, प्रशासनाने परवानगी नाकारली. गावात जमावबंदीचा आदेश लागू केला. तसेच, मतदान घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या गावकऱ्यांपैकी तब्बल ८९ जणांवर प्रशासनाने गुन्हा दाखल केला आहे.‘ईव्हीएम’च्या विरोधात आवाज उठविणारे मारकडवाडी आज देशात गाजत आहे. बॅलेट पेपरवर निवडणुका घ्याव्यात, यासाठी ठोस भूमिका घेणाऱ्या मारकडवाडी ग्रामस्थांच्या भेटीसाठी आज (रविवारी, ०८ डिसेंबर) शरद पवार येत आहेत. त्यांच्या स्वागताची जय्यत तयारी मारकडवाडी ग्रामस्थांनी केली आहे. गावालगतच्या गायरानावर हेलिपॅड उभारण्याचे काम झाले आहे. तसेच, ग्रामपंचायत कार्यालयासमोरील मैदानावर भव्य स्टेज उभारण्यात आला आहे.

### मी बलिदान देण्यास तयार : जानकर



‘‘पुढील १५ दिवसांत मतपत्रिकेवर निवडणूक घेऊन राज्यात आणि देशात जे संशयाचे धुके निर्माण झाले आहे, ते बाजूला करावे, असा आमचा प्रयत्न आहे. निवडणूक आयोगाला आम्ही पत्र देत आहोत. त्यांनी यासाठी होकार दिल्यानंतर मी राजीनामा देणार आहे. ईव्हीएमच्या विरोधात कुणीतरी बलिदान दिले पहिजे. त्यासाठी मी तयार आहे’’, असेही जानकर हे विधानसभेत बोलताना म्हणाले.

### विधीमंडळ आवारात झळकले ‘आय लव मारकडवाडी’चे फलक

विरोधकांनी ‘ईव्हीएम’वर पुन्हा हल्लाबोल सुरू केला आहे. विधीमंडळाच्या आवारात आय लव मारकडवाडी असे फलक झळकले आहेत. दरम्यान, ईव्हीएम मशीनविरोधात रान उठवलेले मारकडवाडीतून आता देशभरात वणवा पेटण्याची शक्यता आहे. शरद पवार यांच्या या दौऱ्यात ईव्हीएम विरोधातील लाँग मार्च काढण्याची तारीख निश्चित होणार आहे.

### मारकडवाडीच्या ठिगणीचा देशभरात वणवा पेटणार

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासमवेत माढ्याचे खासदार धैर्यशील मोहिते पाटील, नूतन आमदार उत्तम जानकर हेही असणार आहेत. पवारांच्या स्वागताची जय्यत तयारी जीवन जानकर, माळशिरस पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील, माळशिरस बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, माजी पंचायत समिती सदस्य माऊली पाटील, डॉ. आप्पासाहेब वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

---

## पवारसाहेब, मी केलेला विकास आणि मोहितेंनी बुडवलेल्या पतसंस्थाही पहाव्यात

### राम सातपुते यांचा टोला

**सोलापूर/प्रतिनिधी**



महाविकास आघाडीचे नेते शरद पवार यांनी मारकडवाडीत केलेला विकास पाहावा तसेच मोहिते पाटलांनी बुडवलेल्या पतसंस्था, लुटलेल्या जमिनी पाहाव्यात,असा टोला माजी आमदार राम सातपुते यांनी हाणला आहे.पवार हे रविवारी मारकडवाडीच्या दौऱ्यावर येणार आहेत.त्याअनुषंगाने सातपुते यांनी पवारांच्या भूमिकेची चिरफाड केली आहे.

सध्या माळशिरस तालुक्यातील मारकडवाडी गावाचे नाव केवळ राज्यच नव्हे तर देशभर गाजत आहे.मतपत्रिकेवर मतदान घेण्यात यावे यासाठी या गावातील ग्रामस्थांनी आंदोलन केले होते. तसेच बॅलेट पेपरवर मतदान घेण्याची तयारी देखील केली होती. मात्र, प्रशासनाच्या आदेशानंतर मतदान प्रक्रिया रद्द झाली. आता याच मारकडवाडीला राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार हे रविवारी भेट देणार आहेत. दरम्यान, याच मुद्यावर माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांनी प्रतिक्रिया दिली आहे. शरद पवार हे मी केलेल्या विकास कामांची पाहणी करायला मारकडवाडीत येणार असल्याचा टोला सातपुते यांनी लगावला आहे. तसेच मोहिते पाटलांसह आमदार उत्तम जानकर यांच्यावर देखील त्यांनी टीका केलीय.

### नेमकं काय म्हणाले राम सातपुते?

मारकडवाडीत शरद पवार साहेब येणार आहेत. मी केलेल्या विकास कामाची पाहणी करायला असे राम सातपुते यांनी म्हटले आहे. मागील ५ वर्षात २१ कोटी ८९ लाख रुपयांची विकासकामे आम्ही मारकडवाडीमध्ये केली आहेत. मारकडवाडीमध्ये आम्ही बोटींग पर्यटन केंद्र पण सुरू केले आहे, त्याचा पवारांनी आनंद घ्यावा असे सातपुते यांनी म्हटले आहे.

### मोहिते पाटलांसह जानकरांवरही टीका

मोहिते पाटलांचा खोटा चालणार नाही. शरद पवारसाहेब येणारच आहात तर मोहिते पाटलांनी बुडवलेल्या पतसंस्था, अकलूज परिसरातील शेतकऱ्यांच्या लुटलेल्या जमिनी, शेतकऱ्यांना लुटत असलेले कारखाने पण पहावेत असे सातपुते म्हणाले. शेतकऱ्यांनी कष्टाने उभा केलेला आणि उत्तम जानकर यांनी विकलेला चांदापुरी साखर कारखाना पण पहावा,अशी टीका देखील सातपुते यांनी केली आहे.

## अर्धवट बांधकाम करून ठेकेदारांनी केली आर्थिक फसवणूक

**सोलापूर :** बांधकाम करण्यासाठी ५ लाख ५४ हजार रुपये घेऊन बांधकाम पूर्ण न करता अर्धवट करून आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी ठेकेदार व त्याच्या पत्नीवर गुन्हा दाखल झाला आहे.

चार-पाच वर्षे झाले तरी बांधकाम पूर्ण झाले नाही. त्यानंतर ठेकेदार यांनी घराचे अर्धवट बांधकाम करून सोडून गेला. याचा जाब विचारला असता,ठेकेदार व त्याच्या पतीने तुमच्या बांधकामाचे काम होणार नाही.थोड्या दिवसांनी तुमचा हिशोब करून तुमचे पैसे परत करू. आमच्या घरी यावयाचे नाही, असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी केली. याप्रकरणी ठेकेदार राजकुमार भीमाशंकर उडचण व पत्नी वर्षा राजकुमार उडचण (दोघे रा.निराळे वस्ती, सोलापूर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला.या घटनेचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव हे करित आहे.

## कंदर येथे दिवसा शेतकऱ्याचे घर फोडले

**करमाळा :** एका शेतकऱ्याच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने रोख रकमेसह २ लाख ९७ हजार रुपये किमतीचे दागिने पळवले. ही चोरी कंदर (ता.करमाळा) येथे गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली.

कंदर येथे अभिजीत जीवन सरडे हे शेतकरी राहण्याचा आहेत. ते गुरुवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. दुपारी दोन वाजता परतले असता त्यांना घरात चोरी झाल्याचे दिसून आले.

चोरट्याने दरवाजाची कडीकोंडा उचकटून घरात प्रवेश केला. आणि कपाटातील रोग ४७ हजार रुपये आणि ५० ग्रॅम सोन्याचे दागिने घेऊन पसार झाला. चोरीचा प्रकार उघडकीस आल्यानंतर सरडे यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. पुढील तपास महिला पोलीस अधिकारी म्हस्के या करीत आहेत.

### मरवडे येथे पूर्वीच्या भांडणावरून

## तरुणाचे हातपाय बांधून मारहाण; १० जणांवर गुन्हा

**मंगळवेढा/प्रतिनिधी**

पूर्वीच्या भांडणावरून एका तरुणास दुचाकीवरून पळवून नेले. त्यानंतर हातपाय बांधून लोखंडी रॉड आणि काठीने मारहाण करीत खिशातील रोकड लुटण्यात आली. ही घटना मंगळवेढा तालुक्यातील बोराळनाका येथे गुरुवारी रात्रीच्या सुमारास घडली.याप्रकरणी मंगळवेढाच्या पोलिसांनी १० जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

बालाजी गणपत पवार (वय ३० रा. मरवडे ता.मंगळवेढा) असे जखमीचे नाव आहे. त्याला पळवून नेऊन मारहाण केल्याप्रकरणी बंडू उर्फ मिथुन हनुमंत अवताडे, त्याचा भाऊ बालाजी अवताडे, निलेश गोवे, उमेश अशोक अवताडे,दर्शन जगताप (सर्व रा.मंगळवेढा) रणजीत पाटील,ऋषिकेश पाटील तसेच अन्य तिघे अनोळखी अशा १० जणाविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

गुरुवारी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास बंडू उर्फ मिथुन अवताडे यांच्या सांगण्यावरून वरील वरील आरोपी ३ दुचाकीवरून येऊन पवार याला धमकी दिली. आणि बळजबरीने त्याला दुचाकीवरून बसवून मरवाडे रोडवर असलेल्या एक्सार एरसार पेट्रोल पंपाजवळ नेले. आणि त्याचे हातपाय बांधून लोखंडी रॉड आणि काठीने बेदम मारहाण केली.

त्यानंतर त्याच्या खिशातील ५० हजार रुपये रोख आणि गळ्यातील ३ ग्रॅमचे सोन्याचे बदाम तोडून नेले. असे त्याच्या फिर्यादीत नमूद आहे. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




शिक्षणाने स्वाभिमानी नक्कीच झाली आहे !

कल्याण

158-42-129

## बाळेतील श्री खंडोबा मंदिरात चंपाषष्ठीचा सोहळा

**सोलापूर/प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र बाळे येथील श्रीखंडोबा मंदिरात शनिवारी चंपाषष्ठीचा धार्मिक सोहळा भक्तीभावाने पार पडला.सोलापूरसह परिसरातील भाविकांनी मंदिरात येवून श्रींचे दर्शन घेतले तसेच वांग्याचे भरीत,बाजरीची व ज्वारीच्या भाकरीचा नैवेद्य दाखवला.

‘सदानंदाचा येळकोट’ ‘येळकोट येळकोट जय मल्हारच्या गजरात भंडारा खोबऱ्याच्या उधळणीत भाविकांनी रांगा लावून कुलदैवताचे दर्शन घेतले. भंडार खोबऱ्याच्या मुक्त हस्ताने करण्यात आलेल्या उधळणीमुळे मंदिर परिसर पिवळया जर्द भंडाऱ्याने माखल्यामुळे सोन्याच्या जेजुरीचा भास होत होता.

श्रीखंडोबाच्या वर्षकाठी भरणाऱ्या आठ यात्रा उत्सवांपैकी चंपाषष्ठी उत्सवाला मोठे महत्व



असते, मणी मल्ल दानवांच्या संहारासाठी शंभू महादेवाचे मार्गशीर्ष शुध्द प्रतिपदा ते मार्गशीर्ष शुध्द षष्ठी या कालावधीत घनघोर युध्द झाले. युध्दात मणीचा अंत झाला आणि




मल्ल शरण आला. विजयानंतर ऋषी मुनींनी चाफ्याच्या फुलांनी, भंडार खोबरे उधळून देवाची पूजा करून विजय दिवस साजरा केला अशी आख्यायिका असून, तेव्हापासून हा उत्सव साजरा केला जातो, तोच हा चंपाषष्ठी उत्सव. आज सकाळी देवाची महापूजा, महाभिषेकानंतर घट उठवण्यात आले. त्यानंतर घराघरांतीलही घट उठले. देवाला वांगे भरीताचा नैवेद्य दाखवून उत्सवाचा उपवास सोडण्यात आला. दरवर्षी मार्गशीर्ष शुध्द प्रतिपदा ते मार्गशीर्ष शुध्द षष्ठी या कालावधीत चंपाषष्टी उत्सव साजरा होतो.



### भरीत रोडग्याचा नैवेद्य

आषाढ नवमीला कांदे नवमी असे ही म्हटले जाते. नवमीपासून खंडोबा भक्त कांदे, लसूण, वांगे खाण्यास वर्ज्य करीत असतात. यालाच चातुर्मास असेही संबोधले जाते. शनिवारी मात्र कुलदैवतला भरीत वांगे कांद्याचा नैवेद्य अर्पण करून हे पदार्थ खाण्यास सुरुवात करतात. सकाळपासूनच मंदिरात भाविकांची मोठी गर्दी होती. सोबत भरीत रोडग्याचा नैवेद्य कुलदैवताला भक्तिभावाने अर्पण करीत होते